# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र
# आयोजित

## भाषा व साहित्याच्या संशोधनाभिमुख अध्यापक-विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा
## (मराठी, इंग्रजी, हिंदी विषयांसाठी)

**बुधवार, दि. 21 फेब्रुवारी 2018**

**स्थळ- दृक्-श्राव्य सभागृह, मुख्य प्रशासकीय इमारत, उ. म. वि., जळगाव.**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातून तयार होणारे मराठी, हिंदी व इंग्रजी विषयांमधील पीएच्. डी. पदवीसाठीचे प्रबंध अधिक गुणवत्तापूर्ण आणि संबंधित विषयांच्या ज्ञानामध्ये मौलिक भर घालणारे ठरावेत यासाठी संबंधित सर्वच घटकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. ही बाब पीएच्. डी. प्रबंधांच्या Pre-submission प्रसंगी आलेल्या अनुभवांमधून अधिकच ठळक झाली आहे. सदर कार्यशाळा आयोजनामागील भूमिका हीच आहे. संशोधन विषयाची निवड, मांडणी, त्यासाठी उपयुक्त संशोधन पध्दती, प्रबंधलेखनाची शिस्त, संदर्भांचे उचित उपयोजन, संशोधनाची साधने व तंत्रे आणि संशोधनाची मौलिकता आदी मुद्द्यांच्या अनुषंगाने या कार्यशाळेत चर्चा होणार आहे.

मराठी, हिंदी व इंग्रजी या विषयांचे पीएच्. डी. मार्गदर्शक, संशोधन करणारे व करू इच्छिणारे विद्यार्थी यांच्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर कार्यशाळेत या तिन्ही विषयांमधील राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यशाळेचे नोंदणी शुल्क रु. पाचशे असून त्यात चहा, नाश्ता, दुपारचे भोजन व कीट उपलब्ध करून देण्यात येईल. कार्यशाळेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी आपली नावे दि. 12 फेब्रुवारी 2018 पर्यंत प्रशाळेत नोंदवावीत.


| | | | |
|---|---|---|---|
| प्रा. मुक्ता महाजन | डॉ. आशुतोष पाटील | डॉ. सुनील कुलकर्णी | प्रा. म. सु. पगारे |
| समन्वयक व | मराठी विभाग | प्रमुख, हिंदी विभाग | संचालक व |
| प्रमुख, इंग्रजी विभाग | | | प्रमुख, मराठी विभाग |
| 9823125190 | 9823365190 | 9422217600 | |